पोलीस अधीक्षक सोलापुर ग्रामीण यांचे कार्यालय
जिल्हाधिकारी कार्यालय कंपाउन्ड,सोलापुर -४१३००३
दुरध्वनी :- ०२१७-२७३२०१०
फॅक्स:- ०२१७-२७३२००८
ई-मेल:- sp.solapur.r@mahapolice.gov.in

जा.क्र.पशा-२/बीडीडीएस साहित्य खरेदी/२०२५- CB- 594C8-593 सोलापुर ग्रामीण-११/०१/२०२४

**संदर्भ -:** मा.पोलीस महसंचालक म.रा.मुंबई यांचेकडील पत्र क्र.पोमंस/१७-अ/६१६२/जिल्हा नियोजन निधी खरेदी/४८/२०२३,दि.२५/०१/२०२४

**विषय -:** बीडीडीएस करिता लागणारे खालील साहित्य पुरवठा करणेच्या निविदा (दरपत्रके) सादर करणेबाबत..

---ooo---

आदेश:-

उपरोक्त संदर्भ व विषयान्वये सादर करण्यात येते की, या घटकाच्या आस्थापनेवरील बीडीडीएस पथकाकरिता लागणारी विविध प्रकारची यंत्रसामुग्री खालील साहित्यचे स्थानिक बाजारातील दरपत्रके सादर करणेकरिता खरेदी करण्याची परवानगी देण्यात येत आहे. तरी खालील नमूद Specification नुसार तसेच नमूद अटी व शर्ती नुसार यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदी खाजगी /अधिकृत विक्रेते यांचेकडून दरपत्रके (निविदा) मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | साहित्याचे नांव | एकूण नग | प्रति नग दर |
|---|---|---|---|
| 1 | Contact less Stethoscope | 01 | |
| 2 | Fire Extinguisher Portable Foam Type | 01 | |
| 3 | Digital Video Camera | 01 | |
| 4 | Blasting Machine | 01 | |
| 5 | Post Blast Investigation Kit | 01 | |
| 6 | Remotely Operated Wire Cutter | 01 | |
| 7 | Car Remote Opening Tool Kit | 01 | |
| 8 | Telescopie Inspection Mirror | 01 | |
| 9 | Search Light | 02 | |
| 10 | Commander Torch | 01 | |
| 11 | Fire Extinguisher Portable Foam Type | 01 | |
| 12 | Ice Tong (Set Consisting of 2 Nos) | 01 | |
| | | | |

**अटी व शर्ती.**

**लिफाफा क्रमांक.१ मध्ये तांत्रीक माहिती खालील प्रमाणे देण्यात यावी.**

१.निविदाकार कंपनीचे पूर्ण नांव व पत्ता दूरध्वनी सह
२.निविदाकार कंपनीच मालकाचे/भागीदाराचे /संचालकांचे पूर्ण नांव व पत्ते दूरध्वनीसह
३.निविदाकार कंपनीचे व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र मागील तीन वर्षापूर्वीचे असणे बंधनकारक आहे.**(Company incorporation /shop Act)**
४.निविदाकार कंपनीचे /मालकाचे PAN CARD/TAN CARD
५.निविदाकार कंपनीचे मागील ३ वर्षाचे Turn Over Certificate

६.निविदाकार कंपनीचे मागील तीन महिन्याचे GST भरणा केलेचे चलन
७.निविदाकार कंपनी किंवा त्याचे मालक/संचालक/भागीदार व त्यांचे जवळचे नातेवाईक यांच्यावर कोणत्याही सरकारी किंवा निमसरकारी कार्यालयामध्ये फसवणूकीची /गैरप्रकाराची किंवा भ्रष्टाचाराची कोणतीही चौकशी चालू/प्रलंबित नसली पाहिजे.तसेच निविदाकार कंपनीची समावेश सरकारी काळया यादीत नसला पाहिजे.अशा प्राकरचे प्रतिज्ञापत्र रू.१००/-च्या स्टॅम्प पेपर वर देणे बंधनकारक आहे.
८.निविदाकार कंपनीचे मालक/संचालक/भागीदार व त्याचे जवळचे नातेवाईक उदा.आई,वडील,भाऊ,बहीण,पत्नी ,पती,मुलगा यांच्या नावावर दोन किंवा जास्त समान व्यवसाय करणा-या स्वतंत्र अथवा भागीदारामध्ये वेगवेगळया कंपन्या रजिस्टर असल्यास सदर कंपनी व मूळ कंपनी अशा दोन किंवा जास्त निविदा सादर करता येणार नाहीत. तसेच अशा प्रकारच्या दोन किंवा जास्त निविदा एकाच वेळी व एकाच निविदेसाठी इतर कोणत्याही शासकीय कार्यालयास सादर केल्या असतील व तसे करून मूळ कंपनीच्या नावावर काम घेतली असेल किंवा नसले अशा कंपन्याना साखळी करून निविदा प्रक्रिया केली असे संबोधले जाईल व अशा कंपन्याच्या निविदा रदद करण्यात येतील. निविदा सादर करणा-या सर्व निविदाकारांनी स्वत:चे प्रतिज्ञापत्र रू.१०० च्या मुंद्राकावर सोबत जोणे आवश्यक आहे.
९.नमूद साहित्य **Specification** नुसारच घेणेत येईल.

**लिफाफा क्रमांक.२ व्यावसायिक.**

१.उपरोक्त नमूद केलेल्या पध्दतीने सादर न झालेल्या निविदा नाकारण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी.
२.निविदेतील प्रत्येक पान हे निविदाकार कपंनीने स्वयंसाक्षकीत करणे आवश्यक आहे.
३.ज्या निविदाकाराची तांत्रीक निविदा छाननी /खरेदी समितीने मंजूर केलेली असेल त्यांचीच व्यावसायिक निविदा (दरपत्रक) उघडण्यात येईल.
४.निविदेसंदर्भातील सर्व निर्णय मा.पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण हे घेतील व ते सर्व निविदाकारावर बंधनकारक असतील.
५.कोणतीही निविदा मंजूर अथवा नांमजूर करण्याचा हक्क तसेच कोणतेही कारण न देता सदर निविदा सुचना पुढे ढकलेली किंवा रदद करणे यांचे अधिकार मा.पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण यांनी राखून ठेवले आहेत.
६.तसेच अशा मंजूर किंवा नामंजूर निविदे बाबत कोणतेही स्पष्टीकरण मा.पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण हे इतर निविदाकारांना देणार नाहीत.
७.कोणत्याही निविदेतील कोणतेही दर बाजारभावापेक्षा खूप जास्त किंवा खूप कमी असतील तर अशा निविदांचा विचार केला जाणार नाही.
८.निविदेमधील सर्व दर हे सर्व प्रचलित करांसहित असावेत.तसेच भविष्यात कर रचना बदलली तरी त्यामध्ये ते सर्व कर दिलेल्या दरामध्ये सामाविष्ठ असावेत.
९.निविदाकार यांना पुरवठा आदेश दिलेनंतर साहित्य एक महिन्याच्या आत पुरवठा करणे बंधनकारक आहे.तसे १०० च्या स्टॅम्पवर लेखी स्वरूपात सादर करावे.

बीडीडीएस पथकाकरिता लागणारी विविध प्रकारची यंत्रसामुग्री करणेबाबचे दर पत्रक(निविदा) या कार्यालयाच्या **www.solapurpolice.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेनंतर **दिनांक.२७/०१/२०२५ रोजी ठिक .६.०० वाजेपर्यत सहा पोलीस निरीक्षक,बीडीडीएस पथक** सोलापूर ग्रामीण येथे सादर कराव्यात विहित मुदती नंतर प्राप्त दरपत्रके स्विकारली जाणार नाहीत.

**पोलीस अधीक्षक,**
**यांचे मान्यतेने.**

**( विजयालक्ष्मी कुर्री )**
**पोलीस उपअधिक्षक (मुख्या),**
**पोलीस अधिक्षक सोलापूर ग्रामीण.**
**यांचेकरिता.**

**प्रति, पोलीस निरीक्षक सायबर पोलीस ठाणे सोलापूर ग्रामीण.**

२/- सदर बीडीडीएस पथकाकरिता लागणारी विविध प्रकारची यंत्रसामुग्री दरपत्रके मागविणे बाबतची जाहिरात या सोबतच्या विवरण पत्रासोबत कार्यालयाच्या www.solapurpolice.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

**प्रत-सहा पोलीस निरीक्षक,बीडीडीएस पथक,सोलापूर ग्रामीण**

२/- वरील बीडीडीएस पथकाकरिता लागणारी विविध प्रकारची यंत्रसामुग्री करणेबाबचे सीलबंद निविदा प्राप्त झालेनंतर आपलेकडील अहवालासाह या कार्यालयास तात्काळ सादर करण्यात याव्यात.

SOLAPUR